# || सस्नेह निमंत्रण ||


श्रृंगेरी शारदाम्बा

अहं ब्रह्मास्मि

दक्षिणाम्नाय श्रृंगेरी शारदापीठम् यांच्या आशीर्वादाने

## वैदिक ज्ञान विज्ञान संस्कृत महाविद्यालय (गुरुकुल) नाशिक

आयोजित

## ।। श्री लक्ष्मीकुबेरयाग ।।

## व

## श्रृंगेरी जगद्गुरु शंकराचार्य पाद्यपूजा व दर्शन सोहळा

रविवार; दि. १३ जानेवारी २०१९ पौष शुद्ध भानुसप्तमी; वेळ : स.११:०० ते १२:३०




परमशिवावतार जगद्गुरु
श्री आद्य शंकराचार्य


श्रृंगेरी जगद्गुरु शंकराचार्य
अनंतश्रीविभूषित भारतीतीर्थ महास्वामीजी
महासन्निधानम्


श्रृंगेरी जगद्गुरु अनंतश्रीविभूषित
विधुशेखर भारती स्वामीजी
सन्निधानम्

---

—● यज्ञ स्थळ ●—

७८९, चित्तपावन कार्यालय बिल्डिंग, एकमुखी दत्त मंदिराजवळ, रविवार पेठ, नाशिक.

॥श्रीः॥

॥ गोदा – रघुवीर – शंकराचार्याः विजयन्तेतराम् ॥

सस्नेह नमस्कार

तीर्थक्षेत्र नाशिकच्या या पवित्र भूमीत, वेदपुरुषाच्या कृपेने, श्रृंगेरी जगद्गुरु प.पू. शंकराचार्य श्री विधुशेखर भारती स्वामीजी दक्षिणाम्नाय श्रृंगेरी शारदापीठम् यांचे अधिष्ठानाने वैदिक ज्ञान विज्ञान संस्कृत महाविद्यालय गुरुकुलाचा विस्तार, प्रचार–प्रसार होण्याच्या हेतूने आणि गुरुकुलाची स्वहक्काची वास्तु होण्याकरीता तसेच विश्वकल्याणासाठी अतीदुर्मिळ असा ``श्री लक्ष्मीकुबेरयाग`` करण्याचे योजिले आहे.

✻ यागाचे महत्व ✻

यज्ञो दानंतपः कर्म न त्याज्यंकार्यमेवतत् ।

यज्ञो दानंतपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥

वरील भगवद् गीतेतील वचना नुसार प्राचीन यज्ञ परंपरा ही विश्वातील अखिल मानवासाठी कल्याण करणारी कामधेनू असल्याने ह्या लक्ष्मीकुबेर यज्ञाचे आयोजन आम्ही केले आहे. यज्ञ, दान व तप केल्याने मनुष्याचे अंतःकरण पवित्र होते.

या यज्ञामध्ये लक्ष्मी व कुबेर यांची पूजा होणार आहे. तसेच लक्ष्मी व कुबेर या देवतांना दहा हजार आहुतींनी हवन केले जाणार आहे. या यज्ञामुळे घरात शांती, मनात शांती, व्यवसायात उन्नती, अभ्यासात प्रगती, सर्वांसाठी आरोग्य, दीर्घायुष्य, ऋध्दी, सिध्दी, यश, किर्ती जे काही चांगले हवे असेल त्याचा लाभ व्हावा असा हेतू ठेवून आम्ही भक्तीभावाने लक्ष्मीकुबेरयागाचे आयोजन केले आहे. अशा या दुर्मिळ यज्ञ सोहळ्यासाठी आपण आवर्जून उपस्थित रहावे.

| लक्ष्मी मंत्र | कुबेर मंत्र |
| --- | --- |
| या देवी सर्वभूतेषु लक्ष्मीरूपेण संस्थिता । | धनदाय नमस्तुभ्यं निधिपद्माधिपाय च । |
| नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ॥ | भवंतु त्वत्प्रसादान्मे धनधान्यादिसंपदः ॥ |

✻ मुख्य कार्यक्रम ✻

रविवार दि. १३ जानेवारी २०१९ पौष शुद्ध भानुसप्तमी

वेळ: स.११:०० ते १२:३० – पूर्णाहुती, पाद्यपूजा, अनुग्रह प्रवचन, आशीर्वचन.

दुपारी ०१:०० ते ०२:०० ``महाप्रसाद``

✻ प्रमुख उपस्थिती ✻

# दक्षिणाम्नाय श्रृंगेरी शारदापीठाधीश्वर जगद्‌गुरु,शंकराचार्य विधुशेखर भारती स्वामीजी महाराज

साक्षात भगवान शिव शंकराचा अवतार असलेले जगद्‌गुरु आद्य शंकराचार्य यांनी बाराशे वर्षांपूर्वी सनातन धर्म व वैदिक संस्कृतीच्या रक्षणासाठी संपूर्ण भारताची अखंड पदयात्रा केली आणि भारताच्या चार दिशांना पूर्वाम्नाय, दक्षिणाम्नाय, पश्चिमाम्नाय, उत्तराम्नाय अशा चतुराम्नायांची म्हणजेच चार धर्मपीठांची स्थापना केली.

त्यापैकी श्रृंगेरी हे दक्षिणाम्नाय धर्मपीठ म्हणून प्रसिद्ध आहे. आपल्या गुरुकुलात येणारे अखिल सनातन वैदिक हिंदु धर्माचे संरक्षक परमहंस परिव्राजकाचार्य श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ अनंतश्री विभूषित जगद्‌गुरु श्री श्री विधुशेखर भारती महास्वामीजी दक्षिणाम्नाय श्रृंगेरी शारदापीठम्‌चे ३७ वे शंकराचार्य आहेत. महाराष्ट्रधर्मविजय यात्रेच्या निमित्ताने ते श्रीक्षेत्र नाशिक,पंचवटी येथे येत आहेत. अकरा वर्षांपूर्वी ३६ वे पीठाधीश्वर प.पू. भारतीतीर्थस्वामीमहाराज महाराष्ट्राच्या धर्मविजय यात्रेत श्रीक्षेत्र नाशिक येथे आले असतांना त्यांनी आपल्या गुरुकुलाला भेट दिली होती. तेंव्हा गुरुकुलातर्फे त्यांची पाद्यपूजा व दर्शन सोहळा आयोजित केला होता. त्याच प्रमाणे या ही वेळेस त्यांचे उत्तराधिकारी श्रृंगेरी जगद्‌गुरु श्री श्री विधुशेखर भारती महास्वामीजी यांची पाद्यपूजा व दर्शन सोहळा इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जगद्‌गुरु शंकराचार्यांचे वेदादि शास्त्र संरक्षण हे नित्यकर्म आहे. त्यामुळे वेदशास्त्रांचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच उपस्थित जनांना त्यांचा आशीर्वाद लाभणार आहे. तरी सर्वांनी त्यांच्या दर्शनाचा व आशीर्वादाचा जवळून लाभ घ्यावा ही विनंती.

✻ आपले विनीत ✻

| | |
|---|---|
| सौ अंजली शशी जाधव<br>अध्यक्ष | स्मार्त चूडामणि पं. शांतारामशास्त्री भानोसे<br>प्राचार्य |

| | | | |
|---|---|---|---|
| वेदमूर्ती श्री दिनेश गायधनी<br>उपप्राचार्य | श्री मदन देवी<br>कोषाध्यक्ष | श्री महेश पैठणे<br>उपाध्यक्ष | श्री जयंत जोशी<br>सचिव |

## ❊ संस्था परिचय ❊



महर्षी योगीश्वर
याज्ञवल्क्य



वेदविद्यारण्य केसरी
पं. नारायण केशव देव गुरुजी



वैदिक सम्राट
पं. श्रीकृष्णशास्त्री गोडशे गुरुजी

प्राचीन भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा म्हणजे आपले वैदिक वाङ्मय. ह्याच ज्ञानाचा प्रसार आणि प्रचार करण्याचे कार्य आपल्या गुरुकुलामार्फत अव्याहतपणे सुरू आहे. वैदिक सम्राट पं.श्रीकृष्णशास्त्री गोडशे गुरुजी ह्यांच्या प्रेरणेने दि. १८ मार्च १९९९ (गुढीपाडवा) या शुभदिनी महाविद्यालयाची स्थापना झाली. या गुरुकुलात वेदाध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था संपूर्णतः निःशुल्क केली जाते.

आजपर्यंत या गुरुकुलातुन अनेक विद्यार्थ्यांनी वेदांचे, दशग्रंथांचे, घनपाठाचे तसेच धार्मिक पौरोहित्याचे, यज्ञ–यागाचे, ज्योतिष शास्त्राचे अध्ययन करुन गुरुकुलाच्या नाव लौकिकात भर घातलेली आहे. याशिवाय देश विदेशातही वेदज्ञानाचा प्रसार – प्रचार करण्याचे मोलाचे कार्य केले आहे.

विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि विस्तार लक्षात घेता गुरुकुलाची स्वहक्काची वास्तू व्हावी, असा मानस आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोकसहभागाची गरज आहे. आपण आपली देणगी गुरुकुलास प्रत्यक्ष भेट देऊन द्यावी. या वेद सेवेत आपलेही योगदान द्यावे ही प्रार्थना.

---

## ❊ संपर्क ❊


**वैदिक ज्ञान विज्ञान संस्कृत महाविद्यालय (गुरुकुल)**
७८९, चित्तपावन कार्यालय बिल्डिंग,
एकमुखी दत्त मंदिराजवळ, रविवार पेठ, नाशिक – ४२२००१
वेळ. : स.१०:०० ते सं.०६:००; मोबाईल नं. : ९८८१२९४४००; ९९२२९१८५१६
ई–मेल : *vaidik.gurukul.info@gmail.com*
वेबसाईट : *www.vaidik-gurukul.org*


मांडणी : मिथिलेश कुंदन मांडवगणे ९८९०११७